**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१८**

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल

**जाहिरात क्रमांक १** **सिंधुदुर्ग** **दिनांक** ५/२/२०१८

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र. ३०२/तुरुंग-१, दि.१५/०१/२०१६ अन्वये), व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस घटकात रिक्त असलेल्या पदांपैकी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून **७५ टक्के** पदेच भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **पोलीस शिपाई :**

| | **खुला** | **अजा** | **अज** | **विज-अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमाप्र** | **इमाव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | १८ | ६ | १६ | ३ | ० | १ | ४ | १ | ४ | ५३ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | ५ | २ | ० | १ | २ | १ | २ | २१ |
| महिला | ५ | २ | ५ | १ | ० | ० | १ | ० | १ | १५ |
| खेळाडु | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ३ | १ | २ | ० | ० | ० | १ | ० | १ | ८ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| पोलीस पाल्य | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| गृहरक्षक दल | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकूण | **१८** | **६** | **१६** | **३** | **०** | **१** | **४** | **१** | **४** | **५३** |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

ड) सध्या पोलीस विभागात वाहन चालकाची पदे स्वतंत्र्यरित्या भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाईपदी नियुक्ती झाल्यावर संबंधित पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

इ) **पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.**

ई) **या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील ०६ रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध आहेत. सदरची पदे उपरोक्त नमूद पदातून उपलब्धतेनुसार भरली जातील.**

**२)** महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/ तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. तसेच,** राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी **महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२ हे नियम लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह** mahapolice.mahaonline.gov.in **या संकेत स्थळावर (Home Page) वर व sindhudurgpolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.**

**३) आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ:-**

जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार खाली दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरु शकतात. आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक, वेळ व ऑनलाईन पद्धतीतील आवेदन अर्ज mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक ०५.०२.२०१८ ते दिनांक २८/.०२.२०१८ रोजी रात्री २४.०० वा. पर्यंत** भरावेत. विहित मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल. उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेबाबतची माहिती, रुपरेषा (Schedule) mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

जाहिरातीत नमुद अटींची पात्रता / अर्हता पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहित दिनांकाच्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरावेत.

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरू होण्याचा दिनांक व वेळ | दि.०६.०२.२०१८ रोजी १२.०० वा.पासुन |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.२८.०२.२०१८ रोजी २४.०० वा. पर्यंत |
| ३ | स्टेट बँकेत पैसे भरण्याची शेवटचा दिनांक | दि.०३.०३.२०१८ रोजी (बँकेच्या वेळेनुसार) |

**४) पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय, शैक्षणिक व शारिरीक पात्रता असणे आवश्यक आहे:-**

i. **वयोमर्यादा:-**

अ) जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी दिनांक २८.०२.२०१८ रोजी कमीत कमी १८ वर्षे पूर्ण आणि जास्तीत जास्त २८ वर्षे (मागासवर्गीय उमेदवारांसाठी जास्तीत जास्त ३३ वर्षे.)

ब) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रकल्प/१००६/मु.स.३६९/प्र.क्र.-५६/०६/१६-अ, मंत्रालय, दि.०३ फेब्रुवारी, २००७ अन्वये प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवारांच्या समांतर आरक्षणासाठी दिनांक २८.०२.२०१८ रोजी उमेदवाराची किमान वयोमर्यादा १८ वर्षांपेक्षा कमी व कमाल वयोमर्यादा **४५ वर्षांपेक्षा** अधिक नसावी.

क) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७१/१०/१६-अ, दिनांक २०.८.२०१० नुसार **माजी सैनिकांसाठी** शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरिता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर **उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी** राहील.

ड) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. २७/१०/२००९ अन्वये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारासाठी दिनांक २८.०२.२०१८ रोजी किमान वयोमर्यादा १८ वर्षांपेक्षा कमी व कमाल वयोमर्यादा **४६ वर्षाहून** अधिक नसावी.

ई) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ व १०.१०.२०१७ मधील तरतुदींनुसार खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत **५ वर्षापर्यंत** वयाची अट शिथिल करण्यात आली आहे.

ii. **शैक्षणिक अर्हता:-**

**अ)** महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षबाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांनुसार).

**ब)** माजी सैनिक: १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

टिप:- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक समक-१०९९/१३४/मशि-४, दिनांक १४.६.१९९९ अन्वये ऐच्छिक हिंदी संस्थांच्या परीक्षांना १२ वी शी समकक्ष म्हणून दिलेली मान्यता ही फक्त हिंदी संस्थांच्या परीक्षांना १२ वी शी समकक्ष म्हणून दिलेली मान्यता ही फक्त हिंदी शिक्षकांच्या जागेवर नेमणुकीसाठी विचारात घ्यावयाची आहे.

iii. अन्य अर्हता:-

- ✓ महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३(१)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्यात येईल व त्या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल, याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील.

- ✓ उपरोक्त नियम ३(१)(ड) नुसार हलके वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त केलेला असणे ही अर्हता असल्यामुळे उमेदवाराने शारिरीक मोजमापाच्या दिवशी सदरचा परवाना व त्याची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. अथवा परवाना प्राप्त केलेला नसल्यास वर नमूद केल्यानुसार नियुक्ती दिल्यानंतर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्याबाबत उमेदवारास हमीपत्र सादर करावे लागेल.

- ✓ तसेच, या अनुषंगाने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना / आदेश उमेदवारास बंधनकारक राहतील व त्याबाबत त्यांना पालन करावे लागेल व कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

- ✓ महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम १२ नंतर नव्याने नियम १३ **[संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे]** अंतर्भुत करण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीसाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. [शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.३.२००३ मधील तरतुदींनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे किंवा शासन पुरकपत्र, सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्र ज्ञान), क्रमांक मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ८.१.२०१८ नुसार ग्राह्य धरावयाची संगणक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. संगणक अर्हता धारण करीत नसलेल्या व पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांस पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.]

- ✓ महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन), नियम २००५ मधील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे. **माजी सैनिक उमेदवारांही सदरहू लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे.**

iv. **शारीरिक पात्रता :-**

| | **महिलां उमेदवारांकरिता** | **पुरुष उमेदवारांकरिता** |
|---|---|---|
| अ) उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | ----- | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. |

**(खेळाडू उमेदवारांसाठी सूचना:- पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम २०११ नुसार आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी. इतकी सूट राहील)**

**५) पोलीस बॅन्ड -**

राज्य राखीव पोलीस बल व कारागृह विभाग वगळुन जिल्हा पोलीस दलातील बँड पथकात इच्छुक महिला उमेदवारांचे स्वागत आहे.

**अ) शैक्षणिक अर्हता:**

बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ब) शारीरिक पात्रतेत सूट:**

बँड पथकाच्या भरतीसाठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील उप नियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहीत केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील:-

(i) उंची :- २.५ से. मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी

(ii) छाती :- २ से. मी. न फुगविता व १.५ से. मी. फुगवुन (पुरुष उमेदवारांसाठी)

**क) अनुभव व इतर अटी:**

**(i)** बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

(ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(iii) पोलीस बँड पथकातील निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहील.

(iv) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

६) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतुदी, खेळाच्या प्रवर्गाकरिता उंचीमधील सुट, व पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांच्याबाबत अनुज्ञेय असलेली सूट mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**७) उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.**

८) आवेदन अर्ज भरतांना उमेदवाराने आवेदन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे, आवेदन अर्ज भरतांना उमेदवाराकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याने, सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे व कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वी उमेदवारांनी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना उघड केलेली माहिती व दाव्याबाबतची प्रमाणपत्रे, विहित पडताळणी अहवाल, कागदपत्रे प्राप्त केलेली नसल्यास उमेदवार अर्ज भरण्यास पात्र नाही. तसे आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणतीही संधी न देता उमेदवारी तात्काळ रद्द केली जाईल.

९) अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे (C.S.C.) भरता येईल. महा ई-सेवा केंद्र (C.S.C.) केंद्रांची यादी व आवश्यक माहिती mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर परीक्षेकरीता **परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे लागू राहील.**

| अ.क्र. | पदाचे नाव | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई | रु. ३७५/- | रु. २२५/- |
| २ | पोलीस शिपाई / बॅन्डस्मन | रु. ३७५/- | रु. २२५/- |
| ३ | कारागृह शिपाई | रु. ३७५/- | रु. २२५/- |
| ४ | माजी सैनिक (फक्त सेवाशुल्क) | रु. १००/- | रु. १००/- |

*** सदरचे शुल्क ना-परतावा आहे.**

या पोलीस शिपाई भरतीचे सर्व नियम व अर्ज करण्याची पद्धत, इत्यादी माहिती mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावरून उमेदवारांनी भरतीबाबतची माहिती प्राप्त करुन अर्हता तपासावी.

१०) **पोलीस विभागातील पोलीस शिपाई पदाची वेतन श्रेणी:-**

रुपये ५,२००-२०,२०० (ग्रेड पे २,०००) + ५०० विशेष वेतन व इतर देय भत्ते.

**११) अर्ज करायची पध्दत :-**

१. पात्र उमेदवारांनी वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन आवेदन अर्ज mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दि. ०६.०२.२०१८ ते दि. २८.०२.२०१८ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

२. क्रेडीट किंवा डेबीट कार्डद्वारा परीक्षा शुल्क भरताक्षणी आवेदनकर्त्यास रक्कम प्राप्त झाल्याचा संदेश (Confirmation) प्राप्त होईल आणि त्यांचे ऑनलाईन ॲप्लीकेशन पुर्ण होईल.

३. बँकेत चलन भरल्यानंतर ४८ तासानंतर Transaction ID आपोआप Update होईल. उमेदवाराने त्याची पडताळणी (Application Status) मध्ये करावी. तसेच Transaction ID Update झाल्याचा संदेश SMS द्वारे प्राप्त होईल.

४. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी १६० पिक्सेल आणि उंची २०० ते २१२ पिक्सेल असावी.) आणि आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल असा असावा व स्वत:ची स्वाक्षरी, जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी २५६ पिक्सेल आणि उंची ६४ पिक्सेल असावी.) आणि स्वाक्षरीचा आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल अशा विहीत पद्धतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.

(टिप:- उमेदवाराने आवेदन अर्जावर जोडावयाचा फोटो हा डोक्यावर कोणत्याही प्रकारची टोपी न घालता काढलेला असावा. कोणत्याही प्रकारची टोपी न घालता व चेहरेपट्टी स्पष्ट ओळखता येईल असा काढलेला फोटो व सही अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्याचाच फोटो व सही अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / सही असल्यास सदर उमेदवारास भरतीच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.) आवेदन अर्ज भरतेवेळी सादर केलेल्या फोटोच्या प्रती भरती प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यापर्यंत सादर करणे अनिवार्य राहील. यासाठी अर्जदाराने कमीत कमी १० फोटोच्या प्रती स्वत:कडे ठेवणे आवश्यक आहे.

अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे (C.S.C) भरता येतील. महाऑनलाईन लि. या संस्थेकडून प्रत्येक जिल्ह्यात महा ई-सेवा केंद्र (C.S.C) उघडण्यात आलेले आहेत.

१२) **महा ई-सेवा केंद्राद्वारे (C.S.C) आवेदन अर्जाची प्रक्रिया:-**

ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला आवेदन अर्ज भरू शकतात. त्याचवेळेस खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून रु.३७५/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. २२५/- एवढे परीक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, माजी सैनिक असलेल्या उमेदवारांकडुन रु. १००/- एवढे सेवाशुल्क आकारले जाईल. **यान्यतिरिक्त महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस/२०१२/प्र.क्र.१५२/३९, दि.२३/०५/२०१२ नुसार महा-ई सेवा केंद्राचे लागु असलेले अतिरीक्त शुल्क उमेदवारांस लागु राहील.** या सुविधामध्ये आवेदन अर्ज भरणे, पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडी तयार करणे इत्यादींचा समावेश असेल**.** उमेदवारास पैसे भरल्याची पावती (Receipt) महा-ई सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल.

इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जर महा-ई सेवा केंद्राकडून (C.S.C.) हव्या असतील तर, सदरच्या प्रती रु. ३/- प्रती पृष्ठ या दराने उपलब्ध होऊ शकतील. फॉर्म भरताना उमेदवाराने स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आय-डी देणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे ई-मेल आय-डी नसल्यास केंद्र चालक उमेदवाराच्या सांगण्याप्रमाणे त्याचा वैयक्तीक ई-मेल आय-डी तयार करुन पडताळणी (verification) करतील. याकरिता कुठलेही अतिरीक्त शुल्क घेतले जाणार नाही. उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेबाबतची माहिती रुपरेखा (Schedule) mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१३) **शारीरिक चाचणी :-**

पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे प्रथम शारीरीक मोजमाप घेण्यात येईल. शारिरीक मोजमापात पात्र ठरलेल्या उमेदवारांची सेवाप्रवेश नियमांतील तरतुदींनुसार कागदपत्र पडताळणीतील पात्रतेच्या अधिन राहून १०० गुणांची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. माजी सैनिकांना शारिरीक चाचणीत देण्यात येणाऱ्या सवलतींचा सविस्तर तपशील mahapolice.mahaonline.gov.in व **sindhudurgpolice.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**महत्त्वाची टीप:-** शारिरीक मोजमापात पात्र उमेदवारांची मैदानी चाचणी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहील. उमेदवाराला देण्यात आलेला भरती प्रक्रियेतील प्रवेश उमेदवाराने ऑनलाईन आवेदन अर्जामध्ये भरलेली माहिती, केलेला दावा ग्राह्य मानून कागदपत्रांची पूर्व छानननी न करता देण्यात येत असल्याने सदरहू प्रवेश कागदपत्र पडताळणी पात्रता व भरती निकषांची पुर्तत यांच्या अधिन राहिल.

१४) **लेखी चाचणी:-**

शारिरीक चाचणीत किमान ५०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यांच्यापैकी, जाहिरातीत नमुद केलेल्या प्रवर्गनिहाय पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांना १०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीतील पात्रतेच्या अधिन राहून पात्र ठरविण्यात येईल.

**लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल.**

**तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादीबाबत:-** शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या पात्रतेच्या अधिन राहून तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती निवडयादी / प्रतीक्षायादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा.सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १६.३.१९९९ व दिनांक १३.८.२०१४ चे परिपत्रक).

तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्या कागदपत्रांचीच पडताळणी करण्यात येऊन, कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसूचीमध्ये समावेश करण्यात येईल. भरती प्रक्रियेत कागदपत्रांची पडताळणी शेवटी करण्यात येणार असली तरी, उमेदवारांनी भरती प्रक्रियेत येतांना प्रवेशपत्रासोबत आवेदन अर्जाची प्रत, आवेदन अर्जात नमूद केलेल्या विहित कालावधीत प्राप्त करुन घेतलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात.

पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहीत देय रक्कम भरणा करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचे बंधपत्र (बाँड / हमीपत्र) संबंधित उमेदवाराकडून घेण्यात येईल.

**टीप:-** गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड यादी जाहिर झाल्यानंतर ऑनलाईन आवेदन अर्जामध्ये दावा केलेल्या जात प्रवर्गासाठीची विहित प्रमाणपत्रे सादर करु शकत नाही अथवा दावा केलेल्या जात प्रवर्गातून निवड झालेली नाही अथवा इतर कोणत्याही सबबीवर खुल्या प्रवर्गात समावेश करण्याचा दावा करता येणार नाही. तसेच, उमेदवार मागास प्रवर्गाचा असल्यास त्याने खुला प्रवर्गातून ऑनलाईन अर्जामध्ये दावा केलेला असेल तर त्या उमेदवारास त्याचा मूळ जात प्रवर्ग पुन्हा मिळण्याबाबत दावा करता येणार नाही.

**१५) अनुकंपा तत्त्वावरील पोलीस शिपाई पदाच्या प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांबाबत:**

शासकीय सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या वर्ग 'क' व 'ड' मधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एकाच पात्र व्यक्तीस अनुकंपा तत्त्वानुसार संबंधीत घटक प्रमुखांकडे असलेल्या यादीवरील ज्येष्ठता क्रमानुसार व अनुकंपा धोरणाबाबत सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार नियुक्ती देण्यात येईल.

सेवाप्रवेश नियम, २०११ मधील नियम ९ मधील तरतुदीनुसार अनुकंपा तत्त्वावरील उमेदवारांसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

- **शारिरीक पात्रता:-**

अ) उंची:- २.५ से.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

ब) छाती:- २ से.मी. न फुगविता व १.५ से.मी. फुगवुन पुरूष उमेदवारांसाठी.

**१६)पोलीस दलातील बेपत्ता / असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणामुळे वैद्यकीय कारणासतव सेवानिवृत्त केलेल्या कर्मचाऱ्याच्या पात्र नातेवाईकाबाबत:-**

सेवाप्रवेश नियम-२०११ मधील नियम ३(२)(ड) नुसार पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणामुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस भरतीसाठी खालील नमुद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

- **शारिरीक पात्रता:-**

अ) उंची:- २.५ से.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

ब) छाती:- २ से.मी. न फुगविता व १.५ से.मी. फुगवुन पुरूष उमेदवारांसाठी.

**खुलासा:- पात्र नातेवाईक यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या खालील कुटुंबियाच्या समावेश असेल.**

i. पती/पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी.
ii. अविवाहीत पोलीस कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबुन असणारा अविवाहीत भाऊ अथवा बहीण.
iii. मृत पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून.

सदर नियमानुसार अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारास पोलीस भरतीसाठी ऑनलाईन अर्ज भरणे अनिवार्य आहे. तसेच सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणेच त्यांची शारिरीक व लेखी चाचणी घेण्यात येईल. सदर उमेदवारास अनुकंपा तत्वावरील उमेदवारांप्रमाणे उंची व छातीमध्ये सवलत देण्यात येईल. अशा उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी संबंधित घटकातील प्रभारी अधिकाऱ्याचे कर्मचारी बेपत्ता असल्याबाबतचे, वैद्यकीय कारणामुळे सेवानिवृत्त केल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक तो अर्ज व त्यासोबत सत्यतापूर्वक माहिती अर्जात उघड केल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करुन संबंधीत कर्मचाऱ्यांचे पूर्ण नांव, पदनाम, कार्यरत ठिकाण, जिल्हा भरती दिनांक इत्यादी बाबी नमूद करुन प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे.

१७) **सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतच्या सूचना:-**

i. **मागासवर्गाचे आरक्षण:-**

क्रिमीलेअरचे तत्व लागू करण्यात आलेल्या प्रवर्गातील (इ.मा.व., वि.जा.-अ, भ.ज.-ब, क, ड व वि.मा.प्र.) उमेदवारांना उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे निकटतम वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वीचे आवश्यक राहील.

सदर प्रमाणपत्रावर निर्गमित केलेला दिनांक, वित्तीय वर्ष नमूद नसल्यास सदर प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच ज्या जातीचे प्रमाणपत्र असेल त्याच जातीचा उल्लेख नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्रावर असणे आवश्यक राहील. अन्यथा जात प्रमाणपत्रावरील नमूद जातप्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही.

उमेदवाराने प्रमाणपत्र सादर करताना प्रमाणपत्रावरील संपूर्ण नाव, निर्गमित दिनांक इ. स्वत:ची माहिती विहित दिनांकाचीच असल्याबाबतची खात्री करूनच सादर करावी. प्रमाणपत्रावर चुकीच्या नावाचा उल्लेख असलेली / सुस्पष्ट निर्गमित दिनांक नसलेली / प्रमाणपत्रावर खाडाखोड असलेली / सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नसलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत. वैध प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. सदरहू प्रमाणपत्रे / कागदपत्रे आवेदन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीची असणे अनिवार्य आहे.

महिला / खेळाडू / माजी सैनिक / भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त / होमगार्ड / अंशकालीन पदविधर / पोलीस पाल्य इ. समांतर आरक्षणापैकी केवळ एकाच समांतर आरक्षणाचा लाभ देय होईल. समांतर आरक्षणांतर्गत पुन्हा समांतर आरक्षण देय होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी यापैकी कोणत्याही एकाच समांतर आरक्षणासाठी आवेदन अर्ज सादर करावा.

ii. **महिला आरक्षण:-**

**अ)** महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे व जर विवाह झाला असेल तर, विवाहानंतरच्या नावाचा उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे.

**ब)** वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय तसेच क्रिमीलेअर, महिला, माजी सैनिक, खेळाडू, गृहरक्षक दल, अंशकालीन उमेदवार इत्यादी संदर्भात न चुकता स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास याबाबत उमेदवाराला नंतर बदल करता येणार नाही. संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही.

**क)** महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि, महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उपलब्ध झाल्या नाहीत. तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

**ड)** खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना ३० टक्के महिला आरक्षणाच्या लाभासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यातील दिलेले विधीग्राह्य नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या महिला उमेदवारास ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही. सदर महिला

आरक्षणाचा दावा केलेल्या महिला उमेदवारांकडे, विधीग्राह्य नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र नसल्यास, उमेदवारास अपात्र करण्यात येईल, हे टाळण्यासाठी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र नसल्यास महिला उमेदवार ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करण्यास इच्छुक असल्यास खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार म्हणून अटी व शर्तींच्या अधिन राहुन ऑनलाईन अर्ज सादर करु शकतील.

**इ)** महिला आरक्षणाबाबत शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का.२, दि. २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेणेसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमेलियर) निकटतम वित्तीय वर्षाचे सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त करुन घेतलेले विहित नमुन्यातील नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील.

ई) शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग, क्रमांक क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का.२, दि. २५ मे, २००१ मधील आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती यामधील मुद्दा क्रमांक १० नुसार विवाहित महिला अर्जदाराने तिच्या पतीचे नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र वरील नमूद कालावधीचे सादर करणे आवश्यक आहे. तसेच विवाहीत महिलांना विवाह निबंधक यांनी विवाह नोंदणीचा दाखला व नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र सादर करणे आवश्यक आहे.

iii. **प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त / भूकंपग्रस्त आरक्षण:-**

शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त व भूकंपग्रस्त अन्वये आरक्षणाची सवलत देण्यात आली आहे. त्याचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्याबाबत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र, तसेच उक्त प्रमाणपत्रावर उमेदवाराचे संपूर्ण नाव असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे. सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त / भूकंपग्रस्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

iv. **गृहरक्षक / होमगार्ड आरक्षण:-**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ८ (iii) नुसार पोलीस शिपाई पदांवर नियुक्ती करतांना एकूण पदांच्या ५% पदे होमगार्डमध्ये जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात कमीत कमी ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील उमेदवारांसाठी राखीव आहेत. **जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) सेवा पूर्ण नसलेल्या उमेदवारास गृहरक्षक पदाचे आरक्षण लाभ देय होणार नाही.** तसेच, **जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा पूर्ण केल्याबाबत** सक्षम प्राधिकाऱ्यांचा म्हणजेच समादेशक यांचा दाखला / प्रमाणपत्र अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचा असणे आवश्यक आहे.

v. **खेळाडू आरक्षण:-**

खेळाडू आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ आणि तद्नंतर यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उपरोक्त नमूद शासन निर्णयातील परिच्छेद २ नुसार गट ‘क’ कर्मचारी निवडीसाठी क्रीडाविषयक अर्हता खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार खेळाडू वर्गातून आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराने क्रीडा विषयक

अर्हता प्रमाणपत्र आवेदन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचे असणे अनिवार्य आहे. कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवाराने त्यांची खेळविषयक सर्व प्रमाणपत्रे एकाचवेळी सादर करणे आवश्यक आहे. खेळाडू प्रवर्गातून गट ‘क’ पदावरील भरतीसाठी दिनांक १.७.२०१६ व दिनांक १०.१०.२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या पात्र स्पर्धा व खेळ पात्र असल्याबाबत / खेळाडू योग्यता प्रमाणपत्र बरोबर असल्याबाबत उमेदवाराने स्वत: खात्री करूनच अर्ज सादर करावा. कोणत्याही टप्प्यावर खेळाडूविषयक विहित पात्रता पूर्ण करत नसल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

| गट | खेळविषयक अर्हता (परिशिष्ट अ प्रमाणे) | खेळविषयक पात्रता | |
|---|---|---|---|
| | | वैयक्तिक स्पर्धा | सांघिक स्पर्धा |
| क | गट अ व गट ब या पदाकरिता विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा<br>१) राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा-राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा.<br>२) राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा<br>३) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>४) राज्यस्तर ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>५) राज्यस्तर आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा (अश्वमेध)<br>६) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधीत विभाग / जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करुन प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक. | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधीत विभाग / जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करुन संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक. |
| टिप | अ.क्र.१ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्समध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच, कब्बडी व खो-खो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी असतील. | | |

अत्यंत महत्त्वाचे:- खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापुर्वी उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक ०१.०७.२०१६ मधील परिच्छेद ४(पांच) व ६(आठ) मधील तरतुदींनुसार खेळाडू उमेदवारांनी पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज करण्यापुर्वीच संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी केलेली असणे आवश्यक आहे (तसेच, सदर पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे). तसे न केल्यास सदरहू शासन निर्णयातील परिच्छेद ६(नऊ) मधील तरतुदीनुसार उमेदवाराचा खेळाडू संवर्गातून विचार करता येत नाही. त्यामुळे संबंधीत विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत खेळाडू उमेदवाराने प्राप्त करणे आवश्यक असून कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहिल.

**टिप:-**

(अ) खेळाडू आरक्षणाचा लाभ घेऊ मिळण्यासाठी उमेदवाराने सादर केलेली क्रीडाविषयक प्रमाणपत्रे तसेच, त्यांनी सादर केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी पात्रता अहवालाची शहानिशा करण्यासाठी संबंधीत विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे पुन:तपासणीसाठी / शहानिशा करण्यासाठी पाठविण्यात येतील. त्यांच्याकडून तपासणीअंती सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यास उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

(ब) अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या (१९९६ चा पहिला) कलम ३३ नुसार प्रत्येक समुचित शासनाने प्रत्येक आस्थापनेवर ३% पेक्षा कमी नाही इतक्या अपंगांची

नियुक्ती करण्याची तरतूद आहे. **तथापि, सदरहू अधिनियमातील कलम ३३ च्या परंतुकान्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस दलातील कामाचे स्वरुप लक्षात घेऊन पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदास सदर अधिनियमाच्या कलम ३३ मधील तरतुदीपासून, शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक उसप्रे-०३९८/सीआर-४५७/भाग-२/पोल-५अ, दिनांक १५.१०.२००३ द्वारे शासनाने सूट दिलेली आहे. त्यामुळे राज्यस्तर पॅरा ऑलिम्कि क्रीडा स्पर्धा व राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी असलेल्या खेळाडू उमेदवारांनी पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज सादर करु नयेत.**

vi. **माजी सैनिक आरक्षण:-**

सामान्य प्रशासन विभागाचे दि. १० ऑक्टोबर १९८० च्या परिपत्रकानुसार माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत माजी सैनिक म्हणून सेवा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (Discharge Book) कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मासैक-१०१२/प्र.क्र.१९८/१६-अ, दि.३०/०४/२०१३ अन्वये सैनिकी सेवेत कार्यरत असणाऱ्या व्यक्तीस त्याची सैन्य दलात १ वर्ष सेवा बाकी असताना महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई / कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी आवेदन अर्ज दाखल करता येईल. त्याबाबत उमेदवाराने सैन्य दलातील सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले ना-हरकत प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल व सैनिकी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर Discharge Book पडताळणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त नमूद विहित प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचे सादर करणे आवश्यक आहे.

**टिप:-** (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक न्याय-२०१४/कोर्ट-९/(प्र.क्र.२४४/१४)/२८, दिनांक ११.९.२०१४ नुसार माजी केंद्रीय हत्यारी पोलीस दल (Ex-CAPF) या दलातील कर्मचाऱ्यांना माजी सैनिकांच्या सोयी सुविधा लागू नाहीत.

(२) युध्द काळात किंवा युध्दात नसताना सैनिकी सेवेत मृत पावलेल्या किंवा अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील एका व्यक्तीस, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २.९.१९८३ व क्रमांक आरटीए-१०८८/९७४/सीआर-२५/१६-अ, दिनांक २२.४.१९८८ मधील तरतुदींनुसार शासकीय सेवेत भरतीकरिता प्राधान्य देय आहे.

vii. **पदवीधर/ पदवीकाधारक अंशकालीन आरक्षण:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाचे दि. २७ ऑक्टोबर २००९ मध्ये नमूद केल्यानुसार व तद्नंतर दिनांक २२ ऑगस्ट २०१४ अन्वये नमूद केल्यानुसार पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी आरक्षण आहे. सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत पदवीधर / पदवीधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांनी शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचे आवश्यक आहे. सदरहू प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

viii. **पोलीस पाल्यांसाठी आरक्षण:-**

शासन निर्णय, गृहविभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५-अ, दि.२२/०८/२०१४ मधील तरतुदी व दिनांक १६.२.२०१६ च्या शासन पत्रातील मार्गदर्शनानुसार पोलीस पाल्यांसाठी खालीलप्रमाणे आरक्षण लागू आहे:

- अंशकालीन पदवीधरांसाठी राखीव असलेल्या समांतर आरक्षणापैकी, **३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस**

**उपनिरीक्षक) पाल्यांसाठी** पोलीस भरतीत राखीव ठेवण्यात येत आहे. सदर सवलत ही गट क व गट ड संवर्गातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना लागू राहील. **सदरहू आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, ते ज्या घटकाच्या पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छित असतील, त्या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदावरील भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.**

- शासकीय सेवेत असतांना दिवंगत / अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीबाबतच्या प्रचलित नियमानुसार अनुकंपा नियुक्ती शासकीय कर्मचाऱ्यांच्या फक्त एकाच नातेवाईकास देता येते.

- सक्तीने सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यास ही सवलत लागू राहणार नाही.

**टिप:-** पोलीस पाल्य म्हणून आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी पोलीस पाल्य असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक किंवा त्यापुर्वीचे आवश्यक आहे. सदरहू प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक राहील.

**२०. उमेदवारांना ऑनलाईन आवेदन अर्जाबाबत व प्रमाणपत्राबाबत विशेष सूचना:-**

- उमेदवाराने अर्जाची नोंदणी केल्यानंतर तो त्याच्या स्वत:च्या नावात, वडीलांच्या नावात, आईच्या नावात, जन्मदिनांक, दावा केलेल्या आरक्षणाचा प्रवर्ग, त्याचे स्वत:चे छायाचित्र व त्याची सही आदि मध्ये बदल करु शकत नाही. परंतु माहिती भरल्यानंतर **Submit (जतन करा)** बटन दाबण्याच्यापुर्वी उमेदवार त्याचा पत्ता व इतर माहिती, शैक्षणिक माहिती इत्यादीमध्ये भरलेल्या माहितीची पडताळणी करून चुकीची असल्यास बदल करु शकतो. परंतु **Submit (जतन करा)** बटन दाबल्यानंतर जर उमेदवारास नोंदलेल्या माहितीमध्ये बदल करावयाचा असल्यास उमेदवार त्याच्या **profile** वर जाऊन **Cancel Application** बटन वर क्लिक करुन ॲप्लीकेशन **Cancel** करु शकतो. ज्या उमेदवाराकडून आवेदन अर्जाचे शुल्क भरले आहे त्याच उमेदवारास **Cancel Application** बटन प्राप्त होईल. प्रथम भरलेले ॲप्लीकेशन **Cancel** केल्यानंतर ॲप्लीकेशन शुल्क परत मिळणार नाही. **प्रथम केलेले ॲप्लीकेशन Cancel केल्यानंतर दुसऱ्यांदा ॲप्लीकेशन भरण्याकरिता उमेदवारांकडुन वर नमुद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क पुन्हा आकारले जाईल.**
- उमेदवाराविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा अथवा खटला दाखल असेल तर त्या गुन्ह्याच्या / खटल्याच्या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती देणे / उघड करणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही स्वरुपाच्या गुन्ह्यातून / खटल्यातून मुक्तता झाली असल्यास त्याबाबतसुद्धा माहिती देणे आवश्यक आहे.
- एच.एस.सी. प्रमाणपत्र अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे ऑन लाईन अर्ज भरावेत. नाव बदलेले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, संबंधित बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत, कागदपत्र व संबंधित ओळखपत्र पडताळणीत सादर करावी.
- खालील नमुद केल्यानुसार साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती उमेदवारांनी सादर करणे आवश्यक राहील.
- शाळा सोडल्याचा दाखला / १० वी चे प्रमाणपत्र.
- जन्म दाखला.
- १२ वी शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र गुणपत्रक.
- अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र.

- संबंधित जात प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे विधीग्राह्य जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात (नॉन क्रिमिलेयर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (अ.जा./अ.ज. वगळून).
- समांतर आरक्षण (होमगार्ड / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / ३०% महिला आरक्षण इ.) मागणी केली असल्यास त्याबद्दलचे विधीग्राह्य प्रमाणपत्र.
- आधारकार्ड.

**महत्वाची टिप-**

ऑन लाईन आवेदन अर्ज भरतानाच वैध कालावधीची सर्व प्रमाणपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावरील उमेदवाराचे स्वत:चे नांव, शिक्का, जात प्रवर्ग, निर्गमित दिनांक, सक्षम प्राधिकाराची स्वाक्षरी इ. बरोबर असल्याची खात्री उमेदवारांने स्वत: करावी. विहित केलेली आवश्यक ती प्रमाणपत्रे त्रुटी, अपूर्ण अथवा अवैध असल्याचे आढळल्यास भरती प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल व त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास उमेदवारास कोणताही हक्क राहणार नाही.

- चुकीची / खोटी कोणताही फेरफार केलेली, खाडाखोड केलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याखेरीत उमेदवारांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**२१. उमेदवारांसाठी विशेष सूचना:-**

i. उमेदवार यांना **पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक व लोहमार्ग जिल्हा यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई / बॅन्डस्मन, राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई / बॅन्डस्मन** व **कारागृह विभागातील कारागृह शिपाई** अशा विविध पदांसाठी आवेदन अर्ज दाखल करता येऊ शकेल. त्यासाठी उमेदवारांस प्रत्येक पदासाठी नव्याने नोंदणी करुन आवेदन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावे लागेल.

ii. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय तसेच क्रिमीलेअर, महिला, माजी सैनिक, खेळाडू, गृहरक्षक दल, अंशकालीन उमेदवार इत्यादी संदर्भात न चुकता स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधीत रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही.

iii. तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांच्या सर्व विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रांची प्रथम छाननी करण्यात येईल. प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी लागू असलेल्या प्रमाणपत्रांची मूळ (Original) व सुस्पष्ट दिसतील अशा साक्षांकित केलेल्या दोन छायांकित प्रती उमेदवाराने कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. मूळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती **प्रमाणपत्रे ही आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंतची किंवा त्यापुर्वीच प्राप्त** केलेले असणे आवश्यक आहे.

iv. उमेदवाराने पोलीस भरतीकरिता येताना पोलीस भरती प्रवेशपत्र सोबत आणावे. विहित नमुन्यातील पोलीस भरती प्रवेश पत्राशिवाय पोलीस भरतीच्या कोणत्याही टप्प्यावरील चाचणीस / तपासणीस प्रवेश दिला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही. उमेदवाराने पोलीस भरतीकरिता येतांना (शारिरीक मोजमापाच्या दिवशी) सोबत त्यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या आवेदन अर्जाची (रजिस्ट्रेशन आयडी नमूद असलेली) प्रत तसेच डाऊनलोड केलेली पोलीस भरती प्रवेशपत्रांच्या (Admit card) २ प्रती तसेच, अलिकडील काढलेले ५ पासपोर्ट साईज फोटो (ऑनलाईन अर्ज भरतांना सादर केलेले) इत्यादी न चुकता आणावे.

v. उमेदवार मागासवर्गीय असूनही खुला प्रवर्ग (Unreserved) म्हणून अर्ज सादर करतात. परंतु कागदपत्र पडताळणीच्या वेळी जातीचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र सादर करुन मागास प्रवर्गाचे लाभ मिळण्याबाबत अर्ज सादर करतात. यास्तव ऑन लाईन अर्ज सादर करण्यापूर्वीच **(संबंधीत पोलीस घटकाच्या आस्थापनेवर त्या मागास प्रवर्गासाठी पदे रिक्त असल्याबाबत खात्री करुन)** त्यांनी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुन नंतरच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी व संबंधित प्रवर्गाचा निर्विवाद दावा अर्ज भरताना करावा. नंतर प्रवर्ग बदलण्याबाबत उमेदवारांकडून अभिवेदन अथवा दावा / तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

vi. कागदपत्र पडताळणीदरम्यान सादर करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रावर संपूर्ण नाव, आवश्यक प्रमाणपत्राचा निर्गमित दिनांक, जात प्रमाणपत्र असल्यास जात व जातीचे वर्गीकरण [SC, ST, OBC, VJ-A (DT-A), NT-B, NT-C, NT-D & SBC] स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहेत. जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र विहित नमुन्यातील असावे.

**vii.** मागासवर्गीय उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले स्वतंत्र जातप्रमाणपत्र व स्वतंत्र नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळून) देणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर न करणाऱ्या उमेदवारास जात प्रवर्गाचा / समांतर आरक्षणाचा लाभ मिळू शकणार नाही. तसेच ज्या उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र नसतील तर असे उमेदवार इच्छुक असल्यास खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार म्हणून अटी व शर्तींच्या अधिन राहुन ऑनलाईन अर्ज सादर करु शकतील.

**viii.** भरती प्रक्रियेदरम्यान मैदानी / कागदपत्र पडताळणीसाठी दिलेल्या तारीख व वेळी उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यांना भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. तथापि, सबळ व उचित कारणे देऊन उमेदवाराने संबंधीत घटक प्रमुखांना लिखित स्वरुपात विनंती केल्यास, त्यांनी अनुपस्थितीबाबत नमूद केलेल्या कारणांची खातरजमा करुन लेखी चाचणी खेरीज इतर चाचणीसाठी पुढील तारीख द्यावी किंवा कसे, याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक राहिल.

**ix.** उमेदवारांनी भरती प्रक्रियेच्या त्या त्या टप्प्याबाबत SMS, E-Mail ID कार्यरत ठेवणे आवश्यक आहे व अधिकृत संकेतस्थळावरुन वेळोवेळी माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. त्याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**x.** आवेदन अर्ज सादर करताना ज्या सामाजिक / समांतर आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी विनंती केली असेल, त्याच सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे विचारात घेण्यात येतील. कागदपत्र पडताळणीच्या वेळी अन्य कोणत्याही सामाजिक / समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नाही. तसेच, याबाबत आवेदन अर्जात कोणताही बदल करता येणार नाही अथवा लाभ दिला जाणार नाही. आवेदन अर्जात दावा केल्यानुसार कागदपत्रे ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा त्या दिनांकापुर्वीची सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहिल. त्यानुसार प्रमाणपत्रे / कागदपत्रे नसल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**xi. सेवाप्रवेश नियमांमधील सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार पुढील आवश्यक त्या चाचणीसाठी पात्र राहतील.**

xii. कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराने, त्यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या आवेदन अर्जाची (रजिस्ट्रेशन आयडी नमूद असलेली) प्रत, पोलीस भरती प्रवेशपत्राची (हॉल तिकिटाची) प्रिंट व आवेदन अर्जावर सादर केलेले ५ पासपोर्ट साईज अलीकडील फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.

xiii. भरती प्रक्रिया सुरु असतांना किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे / प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा निवड होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास

तसेच विहित अर्हता / निकषांची पुर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल.

xiv. सदर भरतीच्या नियम निकषांमध्ये भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल झाल्यास त्या त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती उमेदवारांवर बंधनकारक राहील.

xv. पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी / पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल व वैद्यकीय तपासणीत पात्र असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.

xvi. आवेदन अर्ज भरल्यानंतर त्यातील सर्व माहिती उदा. नांव, जन्मदिनांक, फोटो, भरतीसाठी निवडलेले घटक कार्यालय, जात, शिक्षण, समांतर आरक्षण इत्यादी उमेदवाराने स्वत: तपासून पहावी. आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर अथवा निवड प्रक्रियेच्या दरम्यान यामध्ये कोणतीही दुरुस्ती होणार नसल्याने त्यात काही चुका असल्यास त्या विहित दिनांकापुर्वी त्वरित दुरुस्त कराव्यात. आवेदन अर्जातील चुकांना उमेदवार स्वत: जबाबदार राहतील व त्याबाबत त्यांना कोणताही दावा / दुरुस्ती करण्याचा हक्क राहणार नाही.

xvii. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना / पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी. ऑनलाईन अर्जावरील दिलेल्या स्तंभात उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

**xviii.** रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन कार्यालयात, तसेच समाजकल्याण, जिल्हा सैनिक बोर्ड, आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रात नाव नोंदविलेले उमेदवार, या जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तींची तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करीत असतील, तर त्यांनी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत. अशा उमेदवारांना पोलीस घटकांकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. तसेच, वरील संबंधीत कार्यालयांनी पोलीस भरतीची जाहिरात आपल्या नोटीस बोर्डावर उमेदवारांच्या माहितीसाठी लावण्याची व्यवस्था करावी.

**xix.** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ६ व महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष)(सेवाप्रवेश) नियम-२०१२ नुसार निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ तसेच, शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदी लागु होतील, याशिवाय वैद्यकीय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधळेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग, तोतरेपणा व पोलीस महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकिय चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्यांमध्ये उमेदवारांत दोष आढळल्यास अथवा उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

**xx.** प्रस्तुत भरतीकरिता सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज भरतीकरिता स्विकारले जाणार नाहीत.

**xxi.** उमेदवारास स्वत:ची ओळख पटविण्यासाठी पॅनकार्ड / आधार ओळखपत्र / महाविद्यालयाचे शिकत असल्याचे ओळखपत्र / ड्रायव्हींग लायसन्स / निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही कमीत कमी २ ओळखपत्र (स्पष्ट फोटो असलेले ओळखपत्र) त्यांच्या साक्षांकित प्रतींसह चाचणीच्या वेळी सोबत आणावे लागेल. ओळखपत्र ग्राह्य ठरविण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

xxii. पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा / नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्याकरिता उमेदवाराने स्वत:ची शारिरीक क्षमता विचारात घेऊन मैदानी चाचणीच्या प्रकारात सहभागी व्हावे.

**xxiii.** भरती प्रक्रियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्याकरिता उमेदवारास प्रवास खर्च दिला जाणार नाही. उमेदवाराने प्रत्येक पोलीस भरती चाचणीकरिता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

xxiv. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना दिलेले भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक) व ई-मेल कृपया बदलू नये व कार्यरत ठेवावेत. त्यावरुन उमेदवारांना भरती प्रक्रियेबाबतच्यासूचना वेळोवेळी देण्यात येतील. यासाठी दिलेला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी कार्यरत ठेवण्याची व वारंवार तपासण्याची जबाबदारी उमेदवारांनी राहील. तसेच, संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांची उमेदवारांनी नोंद ठेवून त्याबाबत पुर्तता करणे आवश्यक आहे.

xxv. उमेदवारांना भरती प्रक्रियेबाबतच्या सूचना / निकाल वेळोवेळी mahapolice.mahaonline.gov.in व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in व **sindhudurgpolice.gov.in** या संकेतस्थळावर दिल्या जातील. त्याप्रमाणे उमेदवारांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच, नमूद संकेतस्थळावर जाहिर करण्यात आलेल्या निकालाबाबत, प्राप्त गुणांबाबत, प्रवर्गाबाबत, जन्मतारखेबाबत दिलेल्या विहित मुदतीत आक्षेप न नोंदविल्यास त्यानंतर कोणताही हक्क / दावा उमेदवारांना करता येणार नाही.

xxvi. उमेदवाराची गुणवत्ता यादीतील निवड, भरती निकषांची पुर्तता आणि आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रांची अंतिम पडताळणी / आवश्यक ती पूर्तता, वैद्यकीय चाचणी अहवाल, चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालास अधिन राहून करण्यात येईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. निवड यादीत नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये.

xxvii. पद भरती अथवा वाढीव पदे भरणे किंवा नियुक्ती निर्बंधांबाबत शासनाचे वेळोवेळीचे आदेश निवड झालेल्या उमेदवारांना बंधनकारक असतील व त्या अनुषंगाने नियुक्तीबाबत कोणताही दावा / तक्रार / हक्क राहणार नाही.

xxviii. पोलीस भरतीतील प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील व उमेदवारास बंधनकारक राहील.

xxix. पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग यांना दुरध्वनी क्रमांक ०२३६२-२२२२८९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१८ तथा अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उपअधीक्षक,(मुख्यालय),सिंधुदुर्ग यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील.

xxx. उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. नमूद क्रमांक पोलीस भरती प्रक्रियेसाठी राहील.

| अ. क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास | **e-mail id- mahapolice.support@mahaonline.gov.in** |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्यासंदर्भात अडचण असल्यास | **०२२-२२६६१७६५** |
| ३ | पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | **०२३६२-२२८२२५**<br>**०२३६२-२२८००८** |
| ४ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यालयीन वेळेत) | **०२२-२२०२३६३७** |
| ५ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे **e-mail id:-** | **adg.training.mumbai@mahapolice.gov.in** |

**महत्त्वाची टिप:-**

(अ) शारिरीक मोजमापे व शारिरीक चाचणीच्या निर्णयाबाबत उमेदवाराची तक्रार असल्यास त्यांना मैदानावरील अपिलीय अधिकाऱ्यांकडे दोन अपीले करता येतील. अपिलीय अधिकाऱ्यांचा निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.

(ब) आवेदन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आवेदन अर्जांची प्रतीक्षा न करता, जसजसे आवेदन अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे उमेदवारांना भरती प्रक्रियेत बोलावण्यासाठी प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे उमेदवारांनी लवकरात लवकर आवेदन अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(क) उमेदवाराने "**महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह**",चे कृपया अवलोकन करावे. सदर सेवाप्रवेश नियमांतील अटी व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहतील. ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याची प्रक्रिया याबाबतचे शासन निर्णय, उमेदवारांसाठी सूचना व सेवाप्रवेश नियम www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व **sindhudurgpolice.gov.in** या संकेतस्थळावर (Home page) उपलब्ध आहे.

- सदरहू माहिती काळीपूर्वक वाचून व समजल्याची खात्री करुन उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावा.
- उपरोक्त सूचना शासन निर्णय / परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये काही तफावत आढळल्यास, संबंधित शासन निर्णय / परिपत्रकातील सूचना विचारात घ्याव्यात.
- सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी योग्यता अहवाल (खेळाडू उमेदवारांबाबत) आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक २८.०२.२०१८ किंवा त्यापुर्वीच्या दिनांकाची असावीत व सदरची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

(दिक्षीतकुमार गेडाम)
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग